# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:17.12.2025** **वार:बुधवार**

---

ठळक बातम्या,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इथियोपियाचा सर्वोच्च सन्मान प्रदान, आज ओमानमध्ये दाखल होणार

संसदेत नवे रोजगार आणि उपजीविका हमी अभियान व्हीबीजी रामजी विधेयक सादर

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांची भेट, धोरणात्मक भागीदारीबाबत चर्चा

आशियाई युवा पॅरा क्रीडा स्पर्धेत श्वेता कोवे हिला वैयक्तिक सुवर्णपदक

आणि

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना आज

**<u>इथोपिया</u>**

जागतिक पातळीवरील दूरदर्शी नेतृत्व आणि भारत-इथियोपिया भागीदारी बळकट करण्यामध्ये विलक्षण योगदान दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल इथियोपियाचे पंतप्रधान डॉ. अबी अहमद अली यांच्या हस्ते, सर्वोच्च द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथियोपिया सन्मानाने गौरवण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारे मोदी पहिलेच जागतिक राष्ट्रप्रमुख आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या अफ्रिकन देशांच्या दौऱ्यावर आहेत. मोदींना मिळालेला हा २८वा परदेशी पुरस्कार आहे. हा पुरस्कार मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब असून, इथियोपिया आणि भारत यांच्यातील संबंध दृढ करण्यामध्ये शिक्षकांनी निभावलेल्या भूमिकेचेही कौतुक केले. त्यांनी हा पुरस्कार भारताच्या १४० कोटी नागरिकांना समर्पित केला. तत्पुर्वी, अदीस अबाबा इथं झालेल्या चर्चेत दोन्ही देशांच्या राष्ट्रांच्या पंतप्रधानांनी परस्पर राष्ट्रांचे द्विपक्षीय संबंध धोरणात्मक भागीदारीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला. धोरणात्मक भागीदारीमुळे दोन्ही देशांच्या संबंधांना ऊर्जा, गती आणि विस्तार मिळेल असे मोदी यावेळी म्हणाले. त्याशिवाय, संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमा प्रशिक्षण, सीमाशुल्क बाबींमध्ये परस्पर प्रशासकीय साहाय्य आणि इथोपियाच्या परराष्ट्र मंत्रालयात डेटा सेंटरची स्थापना या तीन क्षेत्रांमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

**<u>पंप्रजॉर्डन</u>**

तीन देशांच्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात जॉर्डन आणि इथियोपियाचा दौरा पूर्ण करून आज पंतप्रधान ओमानमध्ये दाखल होणार आहेत. ओमानचे राष्ट्रप्रमुख सुलतान हैथम बिन तारिक यांच्या आमंत्रणावरून

मोदी, उच्चस्तरीय शिष्टमंडळासह ओमानच्या भेटीवर जात आहेत. दोन दिवसांच्या भेटीदरम्यान दोन्ही देशांदरम्यान, सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्षऱी होण्याची शक्यता आहे.

संसदरोजगार

लोकसभेत काल विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान ग्रामीण विधेयक २०२५ म्हणजेच व्हीबी जी रामजी विधेयक सादर झाले. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर वीस वर्ष जुन्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा म्हणजेच मनरेगाच्या जागी येणार आहे. सरकार महात्मा गांधींची दूरदृष्टी आणि आणि त्यांनी पाहिलेल्या रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकार काम करत असल्याचं प्रतिपादन हे विधेयक मांडताना कृषि आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहांनी संसदेत केले. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली गरिबांच्या उन्नतीसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात असल्याचं ते म्हणाले. भविष्यवेधी, आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास रचना प्रस्थापित करणे हे या विधेयकाचे उद्दीष्ट आहे. नव्या विधेयकात शंभर ऐवजी १२५ दिवसांची रोजगार हमी सुचवण्यात आली आहे. तसंच पेरणी किंवा कापणीच्या हंगामात एकंदर ६० दिवसांचा कालावधी अधिसूचित करायचा अधिकार राज्यांना दिला आहे. यादरम्यान मनरेगाचं काम थांबवलं जाईल, जेणेकरून शेतीतल्या कामांना मजुरांची कमतरता भासणार नाही. मूळ योजनेतून महात्मा गांधींचं नाव काढून टाकल्याचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केली आणि हे विधेयक मागे घ्यायची मागणी केली. यामध्ये मजुरीचे दर केंद्र सरकार अधिसुचित करणार असून, तशी सूचना येईपर्यंत सध्याचे मनरेगाचे मजुरी दर लागू राहातील. या विधेयकामध्ये पंधरा दिवसांत रोजगार उपलब्ध झाला नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद देखील कायद्यामध्ये करण्यात आली आहे.

त्या व्यतिरिक्त, लोकसभेत सबका बीमा सबकी रक्षा हा विमा कायद्यांमध्ये सुधारणा विधेयक २०२५ मंजूर केले, या विधेयकामुळे विमाधारकांना अधिक चांगले संरक्षण देऊन विमा क्षेत्राच्या वाढीला आणि विकासाला गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्या शिवाय कालबाह्य झालेले कायदे रद्द करण्यासाठी निरसन आणि सुधारणा विधेयक २०२५ देखील मंजूर केले. तर राज्यसभेने विनियोजन विधेयक २०२५ मंजूर करून लोकसभेकडे परत पाठवले.

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून बावीस डिसेंबरपर्यंत दक्षिणेकडील राज्यांच्या दौऱ्यावर जात आहेत. सिकंदराबाद इथल्या बोलारम इथल्या राष्ट्रपती निलयम् इथं त्या पोहोचतील. या दौऱ्यात त्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. येत्या १९ तारखेला होणाऱ्या राज्य लोकसेवा आयोग अध्यक्षांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करतील तर ब्रह्मकुमारीज संस्थेने आयोजित केलेल्या परिषदेला त्या २० तारखेला उपस्थित राहतील. राष्ट्रपतींच्या निवासदौऱ्याच्या पार्श्वभुमीवर हैदराबादमधील अलुवाल आणि गचीबोवली परिसरात ड्रोन, विमान, पॅराग्लायडर उड्डाणांवर बंदी घालण्यात आली आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल इस्रायलची राजधानी जेरूसलेममध्ये पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांची भेट घेऊन भारत-इस्रायल धोरणात्मक भागीदारीबाबत सहमती दर्शवली. समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, जयशंकर यांनी दोन्ही देशांदरम्यान तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, कौशल्या आणि बुद्धिमत्ता, संपर्कजाळे आणि सुरक्षितता या क्षेत्रांतील सहकार्य दृढ करण्यावर चर्चा झाल्याचं नमूद केलं आहे. त्याशिवाय जयशंकर यांनी इस्रायलचे अर्थ आणि उद्योगमंत्री नीर बरकत यांचीही भेट घेत दोन्ही देशांदरम्यान गुंतवणूक आणि नवोन्मेष सहकार्य पुढे नेण्यावर चर्चा झाली. तसेच आर्थिक भागीदारीला चालना देणाऱ्या भारत-इस्रायल मुक्त व्यापार कराराची पूर्तता लवकरच होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**<u>नौदलहेलिकॉप्टर</u>**

गोव्यातील आयएनएन हंसा या नौदलाच्या हवाई तळावरून दुसरे ऑस्प्रे एमएच ६० आर आयएनएस ३३५ हेलिकॉप्टर आज भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल करण्यात येईल. नौदलाचं आधुनिकाकरण आणि क्षमता वृद्धिंगत करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतील हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या हेलिकॉप्टरमध्ये प्रगत शस्त्रे, सेन्सर्स आणि एव्हियोनिक्स प्रणाली कार्यान्वित आहे. त्यामुळे नौदलाची क्षमता प्रमुख्यानं अनपेक्षित धोक्यांना सामोरे जाण्याची क्षमता आणखी वाढणार आहे.

**<u>क्वाडसराव</u>**

अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत देशांचा समावेश असलेल्या क्वाड देशांनी हिंद-प्रशांत प्रदेशात जलद नागरी आपत्कालीन प्रतिसादासाठी पहिलाच प्रशिक्षण सराव पूर्ण केला आहे. ऑपरेशन ख्रिसमस ड्रॉप निमित्ताने ८ ते १२ डिसेंबरदरम्यान या सरावाचे आयोजन करण्यात आले होते.

**<u>पारंपरिक औषध शिखर परिषद</u>**

पारंपरिक औषधांवरील दुसरी जागतिक शिखर परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाद्वारे आयोजित, या तीन दिवसीय परिषदेत जगभरातील धोरणकर्ते, शास्त्रज्ञ, चिकित्सक सहभागी होणार आहेत.या कार्यक्रमात २५ हून अधिक सत्रांमध्ये १७० हून अधिक तज्ज्ञ वक्ते सहभागी होतील.

**<u>भूस्थानिकपरिसंस्था</u>**

भारतीय सर्वेक्षण संस्थेच्या वतीनं आज दिल्लीत भूस्थानिक परिसंस्था सक्षमीकरणासंबंधित, जिओस्पेशिअयल मिशन- विकसित भारताचा प्रवर्तक या विषयावरील कार्यशाळेचे आयोजित करण्यात आले आहे. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्रसिह यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. शहर नियोजन, पर्यावरण निरीक्षण आणि पायाभूत विकास सुविधा यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये अत्याधुनिक भूस्थानिक तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करण्याच्या केंद्र सरकारच्या दृष्टीकोनाला पुढे नेण्याच्या दिशेने ही कार्यशाळा महत्त्वाची आहे.

**<u>नेमबाजी</u>**

मध्य प्रदेश मध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये पुरूषांच्या ५० मीटर रायफलच्या अंतिम फेरीत ऐश्वर्य प्रताप तोमरने विक्रम नोंदवत सुवर्णपदक जिंकलं. या स्पर्धेत नीरज कुमारने रौप्य तर अखिल शेओरनने कास्यपदक जिंकले. किरण जाधव चौथ्या स्थानावर तर स्वप्नील कुसळे पाचव्या स्थानावर राहिला.

**<u>आर्चरी</u>**

दुबई इथं नुकत्याच झालेल्या आशियाई युवा पॅरा क्रीडा स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाची विद्यार्थिनी श्वेता कोवे हिला तीरंदाजीमध्ये वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक मिळालं. या स्पर्धेत मिश्र प्रकारातही तिनं कांस्य पदक मिळवलं.

**<u>क्रिकेटटी२०</u>**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना आज संध्याकाळी ७ वाजता लखनऊ इथं खेळला जाणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत दोन सामने जिंकून आघाडीवर आहे.

**<u>क्रिकेट</u>**

१९ वर्षांखालील मुलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतीय संघानं मलेशियाच्या संघावर ३१५ धावांनी विजय मिळवला. दुबई इथं झालेल्या सामन्यात भारतानं ५० षटकांत ४०८ धावा केल्या. या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना मलेशियाचे सर्व फलंदाज ३२ षटकांत केवळ ९३ धावांवर बाद झाले.

**<u>दिल्लीहवामान</u>**

दिल्लीतील हवेची गुणवत्ता पातळी घसरली आहे, त्या पार्श्वभुमीवर, राज्य सरकारने कठोर पावलं उचलली आहेत. दिल्लीत प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांना पेट्रोल पंपावर इंधन दिले जाणार नसल्याची घोषणा दिल्लीचे पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सरसा यांनी दिले आहे. तसंच बांधकाम साहित्य आणणाऱ्या ट्रकवर पूर्णपणे बंदी घालण्यात येणार आहे. त्याशिवाय दिल्लीबाहेरील बीएस६ श्रेणीपेक्षा कमी दर्जाच्या खाजगी वाहनांना राष्ट्रीय राजधानीत प्रवेश दिला जाणार नाही.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**